कलन – ४
दस्त क्र.१२८३० /२०२४
५२ /६८

कल्याण डोंबिवली महानगरपालिका

नगर रचना विभाग

अटी व शर्ती

सुधारित बांधकाम परवानगी क्र.KDMC/TPD/BP/DOM/2018-19/0020/06 Dt.03/04/2023

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ सोबत म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ४५ नुसार मौजे आयरे स.क्र./हि.क्र. ..., ... व ... मधील ४०१.०० चौ.मी. क्षेत्राच्या भूखंडावर तत्कालीन विकास नियंत्रण नियमावली नुसार २९४.०५ चौ.मी. बांधकाम प्रस्ताव परवानगी प्रदान करण्यात आली होती.

एकत्रिकृत (UDCPR) नुसार Basic FSI, Ancellary FSI व जिना क्षेत्र मिळून ५५१.१० चौ.मी. क्षेत्राच्या भूखंडावर विकास प्रस्ताव केलेल्या दि. २०/०१/२०२३ च्या अर्जास अनुसरून खालील अटी व शर्तीस अधिन राहून, सोबत नकाशावर हिरव्या रंगाने दुरुस्ती दाखविल्याप्रमाणे बांधकाम करण्यासाठी, "सुधारित बांधकाम प्रस्ताव" देण्यात येत आहे.

बांधकामाचा तपशील :–

इमारत :– स्टिल्ट + पहिला मजला ते चौथा मजला (रहिवास)

१) एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR)मधील विनियम क्र. २.८.३ नुसार जागेवर प्रत्यक्ष बांधकाम सुरू करण्यापूर्वी बांधकाम मंजुरीचा फलक लावणे आपणांस बंधनकारक राहील.

२) UDCPR मधील विनियम क्र.1.5 Savings मध्ये नमूद a to b बाबत शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या मार्गदर्शक सूचना आपणांस बंधनकारक राहील.

३) बांधकाम चालू करण्यापूर्वी सात दिवस अगोदर महापालिका कार्यालयास लेखी कळविण्यात यावे.

४) UDCPR मधील Appendix-F नुसार प्लिंथ व जोत्याचे बांधकाम झाल्यानंतर वास्तुशिल्पकाराचे प्रमाणपत्र महानगरपालिकेस सादर करण्यात यावे व त्यानंतर पुढील बांधकाम करण्यात यावे.

५) सदर अभिन्यासात कोणत्याही प्रकारचा फेरबदल पूर्व परवानगी घेतल्याशिवाय करू नये, तसे केल्याचे आढळून आल्यास सदरची विकास परवानगी रद्द समजण्यात येईल.

६) UDCPR मधील विनियम क्र. १२.१ ते १२.४ नुसार इमारतीच्या बांधकामाच्या सुरक्षितेची (स्ट्रक्चरल सेफ्टी) जबाबदारी संबंधित वास्तुशिल्पकार, Structural Engineer व पर्यवेक्षक यांचेवर राहील, याची नोंद घ्यावी.

७) भूखंडाकडे जाण्या-येण्याच्या मार्गाची जबाबदारी ... राहील. बांधकाम ... इमारत निर्वासित करण्याआधी रिहे ... महानगरपालिकेच्या ... इमारती व इमारतीमधील ... सेवा-सुविधांची जबाबदारी संबंधितांची राहील.

Page No.2/4

कलन – ४
दस्त क्र.१२८३० /२०२४
५३ /६८

जागेत जुने भाडेकरू असल्यास त्यांच्याबाबत योग्य ती व्यवस्था करण्याची जबाबदारी मालकाची राहील व मालक भाडेकरू यांच्यामध्ये काही वाद असल्यास किंवा निर्माण झाल्यास त्याचे निराकरण मालकाने करणे आवश्यक राहील.

९) सदर जागेत विहीर असल्यास ती संबंधित विभागाच्या परवानगी शिवाय बुजवू नये.

१०) सदर जागेतून जाणाऱ्या नैसर्गिक निचरा होत असल्यास तो मलनि:सारण विभाग (क.डों.म.पा.) च्या परवानगीशिवाय वळवू अथवा बंद करू नये.

११) बांधकामाचे काहीत नकाशात दाखविल्याप्रमाणे इमारतीत महानगरपालिकेच्या बांधकाम खात्याचे परवानगी घेणे आवश्यक राहील व त्याकरिता नियमाप्रमाणे लागणारी रक्कम (व व्याजासह रक्कम) भरणे तसेच विकासकाने महापालिका परिसर च्या सेवा सुविधांचा वापर उचलणे आपणास बंधनकारक राहील.

१२) सदर जागेत बांधकाम करण्याबाबत पूर्वीची बांधकाम परवानगी असेल तर ती या बांधकाम परवानगीमुळे अधिक्रमित (Supersede) झाली असे समजण्यात यावे.

१३) रेखांकन प्रस्तावातील सर्व भूखंड रस्ते, खुल्या जागा, यांची प्रस्तावित नकाशाप्रमाणे जागेवर आखणी भूमी अभिलेख यांचेमार्फत करून घ्यावी व त्यांचेकडील प्रमाणित मोजणी नकाशाची प्रत, सुधारित बांधकाम प्रस्तावास दिल्या तारखेपासून एक वर्षाचे आत सादर करावी.

१४) भूखंडातील आरक्षित भाग प्रमाणे करून व बांधकामे बांधकाम करताना विकास योजना रस्ते विकास नोंदीकृत करावयाच्या करावयाचा क.डों.म.न.पा. विनामूल्य हस्तांतरित करणे.

१५) वापर परवाना दाखला घेण्यापूर्वी कर विभाग, मलनि:सारण विभाग व जलनि:सारण विभाग, अग्निशमन विभाग, पाणी पुरवठा विभाग, उद्यान विभाग, क.डों.म.पा. यांचेकडील ना-हरकत दाखला बांधकाम नकाशासह सादर करणे आपणावर बंधनकारक राहील.

१६) जागेच्या मालकी हक्काबाबत काही वाद असल्यास अथवा निर्माण झाल्यास त्याचे निराकरण करण्याची जबाबदारी आपली राहील.

१७) मोठ्या व सुक्या कचऱ्यासाठी स्वतंत्र कचराकुंड्यांची व्यवस्था करणे आपणावर बंधनकारक राहील.

१८) UDCPR मधील विनियम क्र. १३.३ नुसार भूखंडावरील इमारतीवर रेन वॉटर हार्वेस्टिंग अंमलबजावणी करणे आपणावर बंधनकारक राहील.

१९) वापर परवाना दाखला घेणेपूर्वी मालमत्ता विभागाकडून नोंदणीकृत ... सादर करणे आवश्यक बंधनकारक राहील.

२०) वापर परवाना दाखल्यापूर्वी मा. जिल्हाधिकारी, यांचेकडील सनद सादर करणे आपणास बंधनकारक राहील.

२१) UDCPR मधील विनियम क्र. १३.५ नुसार घनकचरा व्यवस्थापना बाबत कार्यवाही करणे तसेच संबंधित विभागाचा ना हरकत दाखला सादर करणे आपणावर बंधनकारक राहील.

२२) नकाशात हिरव्या रंगाने केलेल्या दुरुस्त्या आपणांस बंधनकारक राहतील.

२३) इमारतीचे बांधकाम या सोबतच्या मंजूर केलेल्या नकाशांप्रमाणे आणि कोठल्याही नाही हितेला अतिक्रमण करणे आपणावर बंधनकारक राहील.

२४) सदर प्रकरणी पुरविलेली व अपुर्ण माहिती दिली असल्यास सदर बांधकाम परवानगी रद्द समजण्यात येईल.

Page No.3/4